Vol 3 Issue 12 Sept 2014

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

*Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 12 | Sept. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# भारतातील स्वदेशीच्या मर्यादा

*टि. जी. सिराळ*

सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शन व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंढा नागनाथ, जि, हिंगोली.

**सारांश :**

भारत सरकारने 1990 च्या आर्थिक आरिष्टावर मात करण्यासाठी शिथिलीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण (Liberalization, privatization & globalization) अशा तिहेरी आर्थिक सुधारणा केल्या. शिथिलीकरणाने ' लायसेन्स आणि परमिट राज ' ची जीवघेणी पकड नाहीशी केली. खाजगीकरणाने गुंतवणूकीचे सरकारी क्षेत्र कमी करण्याच्या संकल्प सोडला, तर जागतिकीकरणाने खाजगी औद्योगिक क्षेत्राचा मनमानीपणा व उपभोक्त्याला नजुमानण्याच्या त्यांच्या वृत्तीला आळा घालावयचे ठरविले. तेव्हा सर्व विरोधी पक्षांनी त्याला विरोध करण्याचा पवित्रा घेतला. हा विरोधाकरिता विरोध होता. कारण विरोधी पक्षांनी जेव्हा सरकारे आली तेव्हा त्यांनी या धोरणांना उचलूनच धरले. अगदी परवापरवा भारतीय जनता पक्षातील काही गटांनी ' दूरसंचारण विनियामक प्राधिकरण ' ' विमाक्षेत्राात खाजगी क्षेत्राचा शिरकाव', 'पेटंटचे बिल' यांना प्रथम विरोध केला पण दुस–या दिवशी घुमजाव करून पाठिंबा दिला. विरोधाचा एक सूर ' सारे स्वदेशी ' वाल्यांचा आहे. जागतिकीरणाने आर्थिक वसाहतवाद येईल, स्वदेशी उद्योगधंदे बंद पडतील, बेकारी वाढेल, राष्ट्राभिमानाचे खच्चीकरण होईल अशी त्यांना भिती वाटते. शिथिलीकरणाच्या पहिल्या तीन वर्षात उद्योगवंतानी आर्थिक सुधारणांचे स्वागत केले. स्पर्धेला आम्ही घाबरत नाही म्हटले. पण संरक्षणाची झूल जसजशी बाजूने होऊ लागली तसतसे त्यांनीही स्वदेशीच्या सुरात सुर मिसळला आहे. स्वदेशी पेक्षा संरक्षणाची झूल त्यांना परत हवी आहे. पण स्वदेशीचे दिवस आत गेले आहेत.

**प्रस्तावना :**

परकिय सत्तेच्या विराधाचे एक हत्यार म्हणून मं. गांधीनी स्वदेशीचा पुरस्कार केला. खादी आणि ग्रामोद्योगाची चळवळ त्यांनी उभारली सुतकताईत श्रमाला प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न होता. पण खादीचा स्वीकार सर्रास झाला नाही. कॉंग्रेसच्या सभासदांपूरती, तशी सक्ती असल्यामुळे ती मर्यादित राहिली. कितीतरी कोटींनी ती खादीभांडारातून पडून होती / आहे. स्वातंत्र्यानंतर खादी हे नोकरी देण्याचे दालन बनले. तीन –चार दशके बीजेचा वापर करायला विरोध झाला. 'मध्यम' तंत्रज्ञानाची जेवहा मध्यंतरी हवा होती, तेव्हा लखनौच्या एका संस्थेने बाराचाकी चरखा शोधला. पण त्याचा प्रसार व प्रचार झाला नाही. 1980 च्या जनता दलाच्या सरकाने पॉलिस्टर खादी पुरस्कारली, पण सर्वमान्य झाली नाही. स्वदेशी म्हणजे खादी, हातसडीचे तांदूळ, घाण्याचे तेल हे समीरकण केले. लोकांच्या आवडी बदलल्या, लोकसंख्या वाढ चालली व लोकांच्या गरजा भागविण्यास खादी अपुरी होती ती अपुरीच राहिली. बदलत्या युगात स्वदेशीची व्याख्याच बदलावयाल हवी, हे स्वदेशीवाले पूर्ण जाणून आहेत. पण 'विरोध' हाच त्यांचा एकमेव कार्यक्रम असल्याने त्यांना ते व्यक्त करता येत नाही.

स्वदेशीचा एक अर्थ स्वावलंबन असा आहे. स्वयंपूर्ण खेडी असा विचार एकेकाळी होता. परंतु नैसर्गिक साधनसंपत्ती सर्वत्र सारखी असत नाही आणि लोकसंख्या स्फोट थोपविता येत नाही. स्वातत्र्याआधीच्या 35 कोटी वरून गेल्या 50 वर्षात 100 कोटींहूनही अधिक लोकसंख्या येऊन थडकली अहे. मानव विकास निर्देशांक पाहिला तर 173 देशांत भारताचा 135 वा क्रमांक (खालून 36 वा) होता. सर्वांना पुरेसे वर्ग, शिक्षक, स्वच्छतागृहे, पाटयोपेन्सिली मिळत नाहीत. स्थूल राष्ट्रीय उत्पादिताच्या (Gross National Product) केवळ तीन टक्के शिक्षणावर विनियोग होत आहे. (तो सहा टक्के व्हायला हवा आहे.) थोडक्यात, विकासाच्या दृष्टीने आर्थिक आणि सामाजिक क्षेत्राात बरीच मजल गाठावयाची आहे. अन्न, वस्त्र, निवारा, उद्योग, शिक्षण, आरोग्य व आधारभूत संरचना (Infrasture) अशी अनेक क्षेत्रे भांडवली गुंतवणूकीसाठी आसुसली आहेत.

आधारभूत संरचने शिवाय उद्योगांची वाढ होणार नाही. रस्ते, वीज, बंदरे यांची उद्योगांच्या, विदेश व्यापाराच्या प्रगतीसाठी आवश्यकता आहे. त्यासाठी राकेश मोहन समितीच्या (1996) अदांजानुसार 1997 ते 2006 या दहा वर्षात 5000 अब्ज रूपये गुंतवणूक लागेल. सहा वर्षे होऊन गेली तरी याबाबतीत निर्णय झालेला नाही. म्हणजे गुंतवणूकीच्या या अंदाजात आणखी वाढ होणारी आहे.

खुद्द केंद्र सरकारचा अर्थसंकल्प तुटीचा आहे. त्यात कर्जावरील व्याज, बिनगुणावह अर्थसहाय्य (सबसिडी) सार्वजनिक उद्योगांचे सालोसाल होत राहिलेले नुकसान यांचा प्रामुख्याने भाग आहे. राज्यसरकारांना वीज, सिंचन व परिवहन या सार्वजनिक सेवांच्या देखभालीचा, घसरीचा खर्च भरून काढण्याइतके दर–भाडे लावण्याचे राजकीय धैर्य असल्याचे आढळत नाही. उलट शेतसारा काढून टाकण्याकडे, शेतक–यांना फुकट वीज देण्याकडे (केंद्र राज्य समन्वय समितीने विजेसाठी युनिटला 50 पैसे दर लावावा असे ठरवूनही) राज्यांची अहमहमिका लागलेली दिसते.

अशा गुंतवणूकीसाठी अनिवासी भारतीयांचा, परदेशातील चिनी लोकांनी चीनला जसा पैशाचा ओघ पाठविला तसा, हातभार लागेल अशी अपेक्षा केली जाते. ही अपेक्षा सरकार स्थिर राहील या गृहीतकावर आधरलेली आहे. पण जेव्हा भारत 1990 मध्ये अडचणीत होता, तेव्हा पैसा काढून घेण्यास अनिवासी भारतीय अग्रेसर होते हे विसरता येत नाही. शिवाय अलीकडे ' परदेशात जमा केलेले पैसे आधारभूत संरचनेत गुंतवू ' असे आश्वासन देऊनही, भारतसरकार त्याबाबत अनिश्चितता दाखवीत आहे. त्यामुळे या मार्गावर फारसे विसंबता येत नाही.

अशा स्थितीत परदेशीयांची गुंतवणूक हा एक मार्ग आहे आणि तो सुकर करून देणे अपरिहार्य आहे.

स्वदेशीचा दुसरा अर्थ जागतिकीकरणास विरोध असा आहे. जागतिकीकरण म्हणजे, व्यवहारात, बहुराष्ट्रीय कंपन्याना भारतात खुलेपणाने येऊ देणे, बहुराष्ट्रीय कंपन्याना भारतात खुलेपणाने येऊ देणे, बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात उत्पादक (उदा. वीज प्रकल्प) व कारखाने सुरू करतील. नवनवे उत्पादनतंत्र आणतील व त्यामुळे निर्यातही वाढेल.

यापुढे सर्वच देशातून बहुराष्ट्रीय कंपन्याचे जाळे वाढणार आहे. ते वाढलेलेच आहे. अशा कंपन्याना राजकीय–राष्ट्रीय सीमा राहिलेल्या नाहीत. इथे हे विसरता कामा नये, की जागतकीकरणाचा, खुलेपणाचा फायदा उठविण्यात भारतीय कंपन्याही मागे नाहीत.

नवनवीन व्यापार क्षेत्रे, बाजार काबीज करण्यासाठी व यांत येणारे प्रामुख्याने सीमाशुल्क सारखे अडथळे बाजूला करण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या विस्तारत राहणा–या आहेत. जागतिक सहकार यापुढे अटळ आहे.

याचबरोबर बहुराष्ट्रीय संघटनाही वाढणा–या आहेत.पर्यावरणाचा नाश, दहशतवाद, शस्त्रास्त्रनिर्मिती व त्यांचा व्यापार यांवर नियंत्रण व नियमन वगैरेसाठी युनो, जागतिक व्यापारी संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बॅंक अशा संघटना, प्रबळ व्हायला हव्यात व त्यातील प्रबळ राष्ट्रांची मक्तेदारी कमी व्हायला हवी.

बहुराष्ट्रीय कंपन्यांना विरोध आहे तो – 1) जे उद्योग संरक्षणात वाढले आहेत व जगत आहेत त्यांचा, 2) बेकारी येईल म्हणून कामगारांचा, 3) आर्थिक वसाहतवाद येईल म्हणून मागास देशांचा.

संरक्षित उद्योगांनी आधुनिकीकरणाकडे दुर्लक्ष केले आहे. वस्तुंची गुणवत्ता सुधारावी म्हणून काही प्रयत्न केलेला नाही. आजारी उद्योगांचे प्रमाण वाढते राहिले व ते सरकारच्या गळयात बांधण्याच्या योजना आखल्या गेल्या. (कर्नाटक सोन्याच्या खाणी, कापड गिरण्या ही यांची ठळक उदाहरणे) संरक्षणाच्या छायेखाली वाढल्यामुळे अशा उद्योगांना स्पर्धेची भीती वाटते.

यावर आधुनिकीकरण हाच उपाय आहे. उद्योगांनी आधुननिकीकरणासाठी नवे तंत्रज्ञान मिळवावयास व आत्मसात करावयास हवे. यासाठी परदेशी जाऊन प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. जपानने हे केले होते. किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांना बोलावून इथे नवा कारखाना काढला तर बहुराष्ट्रीय कंपन्यांन त्यांच्या तंत्रज्ञानाची माहिती, प्रशिक्षण स्थानिक कामगारांना द्यायला हवे, तंत्रज्ञान आयात करताना, संयुक्त उपक्रम सुरू करताना अशी अट घालता येते, घातलीही जाते.

संरक्षणामुळे बेफिकीरी वाढलेली आपल्याला आढळते. वस्तुंची गुणवत्ताही ढासळलेली दिसते. यावर स्पर्धा हाच उपाय आहे. आधी स्वदेशात स्पर्धा वाढू दे, मग बहुराष्ट्रीय कंपन्यांना वाव दिला जावा असा विचार मांडला गेला आहे. परंतु स्वदेशात असे स्पर्धक आहेत का हे कुणी पाहिलेले नाही. स्पर्धेची झळ लागल्याशिवाय स्वदेशी उद्योग जागे व्हावयाचे नाहीत व त्याची 'चलता है ' वृत्ती जायची नाही.

बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे आर्थिक वसाहतवाद येईल अशी भीती व्यक्त केली जाते. या भीतीचे मुळ पारतंत्र्यात शोधले जाते. इंग्रज व्यापारी उद्दिष्टाने हिंदुस्थानात आले व हिंदुस्थानाची त्यांनी वसाहत बनवली. ती कशी बनली

यांच्या खोलात शिरायची ही जागा नव्हे. पण इंग्रज वरचढ बनायला आपणच कारणीभूत होतो हे विसरता येत नाही. आपआपसातील व्देष व सूड उपवायला इंग्रजांना निमंत्रण, युध्द तंत्रातील नवे कौशल्य (तोफा, बंदुका) शिकुन आत्मसात करायला आपला नकार व हलगर्जीपणा, फितुरी जातींनी पोखरलेला समाज ही यांची प्रमुख कारणे आहेत. परंतु या कारणंचा शोध न घेता व्यापारी निमित्ताने येणा–या आजच्या बहुराष्ट्रीय कंपन्या स्वदेशी उद्योगांवर कुरघोडी करतील असे प्रचरिले जाते. नाकर्तेपणाची ही भीती आहे. कोरिया, तैवान, सिंगापूर व अलीकडे चीन या देशांतून बहुराष्ट्रीय कंपन्या आलेल्या आहेत. आणि तरीही त्यांचे सार्वभौमत्व नाहीसे झालेले नाही, उलट त्यामुळे या देशांतून औद्योगिकीकरण झपाटयाने होऊन ते भारताच्या (प्रतिव्यक्ती उत्पन्नात) पुढे गेलेले आपण पाहत आहोत.

बहुराष्ट्रीय कंपन्या एकाच देशाच्या नाहीत की ज्यामुळे त्या देशाचेच वर्चस्व राहील. त्या फ्रान्स, जर्मनी, अमेरिका व अन्य युरोपीय देशांच्या देखील आहेत. त्यांच्यात तीव्र स्पर्धा आहे. एवढेच नव्हे तर एकाच देशातील अनेक कंपन्यांतून चूरस आहे. तेव्हा आज तरी एकाच देशाचे उद्योग, साम्राज्य व वर्चस्व राखतील असा संभव नाही. ते राहू नये यासाठी अन्य देशांनी जागरूक राहावयास हवे व मुत्सद्देगिरी दाखवावयास हवी. गरीब व दुबळया देशांनी दबून जाता कामा नये व गाफील राहता कामा नये. टिटोचा युगोस्लाव्हिया स्टालिनच्या रशियापुढे व अमेरिकापुढे नमना नाही. इराक हे अलीकडचे ताजे उदाहरण आहे.

माहिती मिळविण्याच्या तंत्रात आता प्रचंड क्रांती झालेली आहे. संगणक, फॅक्स मशिन्स, टेलिफोन्स, कॉपीयर्स, व्हिडिओ कॅसेटस यातून सॅटेलाईटच्या माध्यमाव्दारा घरबसल्या कोणतीही माहिती मिळू शकते. म्हणजे दळणवळणाच्या व्दारा जग अगदी जवळ आलेले आहे.

बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे देशांच्या सीमा गळून पडत आहेत. जिथे देशांच्या सीमाच नाहीत, तिथे वसाहतींना स्थान नाही. बहुराष्ट्रीय कंपन्या सर्वत्र – पाश्चिमात्य देशात परस्परांतून चीनसारख्या साम्यवादी देशांतूनही परसलेल्या आहेत. मुबलक सुविधा व राजकीय स्थीरता कुठे आहे याचा वेध घेत आहेत. सीमाशुल्कावर मात करणे, श्रमाच्या स्वस्ताईचा लाभ उठविणे एवढा या कंपन्याचा हेतू आहे, प्रशासन काबीज करणे हा नाही. बहुराष्ट्रीय कंपन्या येतात त्या वसाहत वादाचे धोरण घेऊन येत नाहीत व जागृत देशातून ते चालणार ही नाही. तेव्हा ती भीती बाळगण्याचे काही कारण नाही. शिवाय बहुराष्ट्रीय कंपन्यांची कशी वर्द्रवणूक ठेवली पाहिजे, याचे संकेत विशद केले गेले आहेत.

उलट सर्वत्र बहुराष्ट्रीय कंपन्या विखुरल्सास युध्दाचा धोका कमी होण्याची शक्यता आहे. कंपन्यामुळे देवाणघेवाण वाढून शस्त्रांपेक्षा विचारविनिमयावर भर दिला जाऊ शकेल. बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे देशात बेकारी वाढू शकेल ही देखील भीती आहे. पण बेकारीला बहुराष्ट्रीय कंपन्या तेवढयाच जबाबदार नाहीत. एकतर अलीकडे उत्पादनतंत्रात झपाटयाने बदल होत आहे. उत्पादनात अचूकपणा येण्यासाठी संगणकांचा कष्टाच्या, बोजडच्या व एकसुरी कामांसाठी यंत्रमानवांचा (रोबोटस) उपयोग केला जात आहे. यामुळे मानवी श्रमाची (काही विशिष्ट उद्योगांसाठी) गरज कमी होत आहे. शिवाय उत्पादनक्षेत्रातही पालट होत आहे. शक्तीचा उपयोग करणा–या व्यवसायातून बुध्दिचा उपयोग करणा–या व्यवसायाकडे रोजगार झुकलेला आहे. या वाढत्या सेवाक्षेत्रात कोणत्या प्रकारचे शिक्षण व कौशल्य हवे हे जाणून घेऊन शिक्षणव्यवस्थेत बदल घडवून आणयला हवा. चालू उद्योगांतून प्रशिक्षणावर भर देऊन कामगारांना तयार करायला हवे. जपान व चीन या देशांनी असे केल आहे.

बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे आपली संस्कृती नष्ट होत आहे. असाही गिल्ला केला जात आहे. परदेशी वस्तुंची चटक आपल्याला लागेल व चंगळवाद वाढेल अशी हाकाटी असते.

आपल्या सोयी पुरविणा–या सुविधा मिळविणे, हौस पुरविणे म्हणजे चंगळवाद, गॅसच्या शेगडया, रेफ्रिजरेटर्स, मिक्सर्स, धुलाई यंत्रे या आता गरजा बनलेल्या आहेत. धूर डोळयात घेत चूल फुंकत राहण्याची संस्कृती आता मोडकळीस आलेली आहे. पश्चिमेशी संपक वाढल्यावर अशा गरजांची आपल्याला जाणीव सवय झालेली आहे. ज्या श्रीमंताच्या घरात या वस्तु होत्या, ज्यांची राहणीमान उंचावलेली होती, त्यांचे अनुकरण विस्तारले आहे. जीवनराहणीमानाचा स्तर उंचावत राहावा, आपल्याहून आपल्या मुलांनी चांगल्या त–हेने जीवन जगावे ही सहज मानवी प्रवृती आहे. पूर्वीचे आश्रम ही आता प्रदर्शनातील गोष्ट राहिलेली आहे. नवी पिढी चंगळवादी बनली आहे. ही जुन्या पिढीची नेहमीचीच तक्रार आहे.

पेस्ट, साबण, चहा, शाम्पू, व औषधे या आंतरराष्ट्रीय कंपनयाच्या वस्तंनी आपली सकाळ सुरू होत आहे. हे आपण विसरतो. 'स्वदेशी' कंपन्यांनी बनवलेल्या अशा वस्तु किती स्वदेशीवाल्यांच्या स्वतःच्या घरी वापरात असतात याची पाहणी करायला हवी. देशी बनावटीच्या ब्लेड, टूथपेस्ट, पेन अशा वस्तु वापरून बघितल्या पण त्यांना परदेसी बनावटीची सर नाही. या परदेशी वस्तुनी आपली आवड, चव बदलेली आहे. त्यात आता बदल झालेला आपल्याला खपत नाही. समाजातला मध्यमवर्ग वाढत चालला आहे. पूर्वीच्या कामगारवर्ग (वाढत्या वेतनामुळे) आता मध्यमवर्गातच मोडत आहे. त्याच्या आवडीही बदलत चालल्या आहेत. (ब्युटी पार्लर्स आता खेडयातूनही आढळतात) देशातील सर्वाना पाश्चिमात्य वस्तुंची जाणीव, आवड व आशा आहे. तशाच व तितक्याच गुणवत्तेच्या वस्तु स्वदेशात व्हाव्यात अशी त्यांची अपेक्षा आहे. या वस्तु निर्माण करणारे तंत्रज्ञान भारतात उपलब्ध व्हावे व स्वदेशी कारखानदारांनी पाश्चिमात्य सहयोगाने ते आणावे असे त्यांना वाटते ही लाट परतविना येणार नाही.

बहुराष्ट्रीय व त्यांच्या सहयोगी कंपन्या उद्योग आणतात कारखाना उभा करतात. फायदा मिळवणे हा त्यांचा हेतू असतो. पण सगळा फायदा त्या स्वगृही नेतात हा प्रचार आहे. प्रत्यक्ष परिस्थिती तशी नाही. कारण कारखान्यांचा विस्तार करायला त्या आपला फायदा इथेच गुंतवतात. अशी गुंतवणूक करायला आजवर भारतीय उद्योजक पुढे आले

नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. उद्योगप्रियता, उद्योजकता, श्रमसंस्कृती यांचा पूर्ण अभाव नसला तरी आपल्यात हे गुण कमी आहेत हे इतिहासानेच सिध्द केलेले आहे. तेव्हा बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या म्हणून हाकाटी करण्यात अर्थ नाही.

बहुराष्ट्रीय कंपन्या येऊ देत पण त्यांनी आधारभूत संरचना निर्माण करण्याकडे वळावे असे सूचविले जाते. म्हणजे रस्ते परिवहन, दळणवळण, ऊर्जा, अशा दीर्घकाळ गुंतवणूक लागणा–या व परताव्यावर नियंत्रण राखणा–या क्षेत्रांतून त्यांनी यावे असा याचा अर्थ होतो. यामुळे स्वदेशीयांचा नफा वाढायला व त्यांच्या क्षेत्राला धक्का न लागण्याला मदत होईल हा केवळ आपमतलबीपणा झाला, स्वदेशीचे प्रेम नव्हे !

स्वदेशीचा खरा अर्थ म्हणजे प्रगत तंत्रज्ञान शिकून घेणे , आत्मसात करणे, उत्पादनात त्याचा अवलंब करणे, उत्पादनाचा दर्जा वाढविणे, स्वस्ताई व मुबलकता वाढविणे, त्यात सतत संशोधन करीत राहणे असा आहे. बहुराष्ट्रीय कंपन्याचा त्यासाठी कसा उपयोग करून घ्यायचा याबद्दलची मुत्सद्देगिरी व सावधपणा बाळगायला हवे. अपेक्षा व आवडी बदलत राहतात हे ध्यानी बाळगून उत्पादन व्यवस्था बदलती राखायला हवी. भयगंड न बाळगता स्पर्धेला सामोरे जायला हवे. संरक्षणाचा पांगुळगाडा फेकून द्यायला हवा. बदलत राहणा–या संस्कृतीचे भान राखायला हवे. 'गि–हाईकाचे समाधान' करणारी कृती जोपासयला हवी.

***संदर्भ :***

1.शंकरराव कोल्हे, जागतिक व्यापाराचे आव्हान, दैनिक सकाळ, पुणे 24 ते 28 ऑक्टोबर 2000.
2.सी. पं. खेर, आर्थिक सुधारणांचे नवे पर्व, दिलीपराज प्रकाशन, पुणे
3.वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन, वार्षिक अहवाल,1999 व 2000.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net